Pune Police

**प्रेस नोट** दि.२७/०९/२०१७

## चंदननगर पोलीसाची कामगीरी - मोबाईलचे दुकान फोडून मोबाईल चोरून नेणा-या सराईत आंतरराजीय टोळीस चंदननगर पोलीसांनी शिताफीने केली अटक

चंदननगर पोलीस ठाणे येथे दाखल असलेला गुन्हा.रजि.नं.१८४/२०१७ भादवि कलम ४५७,३८०,३४ मध्ये गुरू मोबाईल शॉपी आनंद पार्क, वडगावशेरी, पुणे येथून रात्रौ. मोबाईल शॉपी बंद असताना कोणीतरी अज्ञात इसमाने दुकान फोडून दुकानात असलेले वेगवेगळ्या कंपनीचे ४,३७,६९७/- रूपये किंमतीचे ओपो, व्हिओ, सॅमसंग, इनटेक्स आयटेल, एल वाय एफ व लि फोन इत्यादी मोबाईल कंपन्यांचे एकुण ४६ मोबाईल हॅन्डसेट चोरून नेले आहे म्हणून गुन्हा दाखल आहे.

चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मुळीक सो.यांचे मार्गदशनाखाली दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले मोबाईलचा व गुन्हेगाराचा तपास चालु असताना मिळालेले माहीती वरुन चोरीस गेलेले मोबाईल पैकी एक मोबाईल हा राजुगिरी ओमगिरी गोस्वामी वय-२० वर्ष, रा.कस्तुरी चौक रविवार पेठ,महाराणा दरबार हॉटेल पुणे,मुळ गांव-पाती, ता. रोहोत, जि. पाली, राजस्थान हा वापरत असल्याची माहीती मिळाल्याने त्यास पोलीस स्टेशन येथे घेवुन येवुन अटक करून त्याचे माहितीवरून त्याचेकडे मिळून आलेला दाखल गुन्हयातील एक मोबाईल हॅडसेंट हा जप्त करून अधिक माहिती घेता सदर मोबाईल हा येरवडा कारागृहामध्ये असलेले फरासखाना पोलीस स्टेशनकडील दरोडयाच्या गुन्हयातील आरोपी नामे १. भैरुमल हरीशंकर रावल, वय २० वर्ष रा हॉटेल महाराणा दरबार,४९ रविवारपेठ कस्तुरी चौक पुणे. मुळगाव पाता ता सुमेरपुर,जि पाली राजस्थान व त्याचे साथीदार २. जितेंद्र सुमेरसिंग राठोड वय २४ वर्ष रा हॉटेल महाराणा दरबार ४९ रविवार पेठ पुणे मुळगाव बावत्रा ता. सायला जि जालोर राज्य राजस्थान, यांचा वरील मोबाईल चोरीच्या गुन्हयात सहभाग असल्याचे सांगितल्याने त्यांना येरवडा जेलमधून ताब्यात घेवून दाखल गुन्हयात अटक करून त्यांचेकडे केले तपासात त्यांनी त्यांच्या इतर साथीदारांची नावे ३. मनोहरसिंग भुरसिंग राजपुत वय २२ वर्षे, रा. मु. पो. नागीनी. ता. देवदर, जि. सिरोही, राज्य राजस्थान, ४. हरशिद जगदिश अमीन, वय २१ वर्षे, रा. बी/११३, जिकम नगर, वरुण कॉम्प्लेक्स, सुरत रोड, गुजरात, ५. कल्याणसिंग सांतुसिंग ढाबी, वय १९ वर्षे, रा. मु. पो. आवल, ता. अमीरगड, जि. बनासकाटा, राज्य गुजरात असे असल्याचे सांगितलेवरून त्यांचा शोध घेणेकामी व चोरी केलेले मोबाईल हस्तगत करणेकामी चंदननगर पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व स्टाफ यांनी राजस्थान व गुजरात येथून आरोपीकडून विविध मोबाईल हॅडसेंट किं.रू. ३,११,२०७/- किंमतीचे २६ मोबाईल वेगवेगळे कंपनीचे जप्त करण्यात आलेले आहेत. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल झांजुर्णे हे करीत आहेत.

उपरोक्त कारवाई पोलीस उप आयुक्त सो.परी मंडळ ४ श्री दिपक सोकोरे, सहा पोलीस आयुक्त सो. खडकी विभाग श्री वसंत तांबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंदननगर पोलीस स्टेशन श्री.राजेंद्र मुळीक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक श्री विठ्ठल झांजूर्णे, पोलीस उप-निरीक्षक सुधीर पाटील, तपास पथकाचे पोलीस कर्मचारी श्रीकांत गांगुर्डे व रवि रोकडे, प्रदीप सोनावणे, प्रशांत दुधाळ, मोहन वाळके, पंडित गावडे, आण्णा माने, अविनाश गोरे, आनंद दरेकर, राहुल इंगळे,किरण पलांडे आणी अतुल जाधव यांनी केली आहे .


lephone
oppo
Galaxy J5

